|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)



## विद्यार्थी विकास विभाग

जा.क्र. कबचौउमवि/१४/विवि /वि.सा.स.-११६/ **५४** /२०२५ दि. १८/०२/२०२५

प्रति,

१) मा. प्राचार्य/ संचालक, कबचौउमविशी संलग्नीत महाविद्यालय, मान्यता प्राप्त परिसंस्था

२) मा. संचालक/ विभागप्रमुख, विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा-विभाग

**विषय :- विद्यापीठस्तरीय तिसरे बहिणाबाई विद्यार्थी साहित्य संमेलनाबाबत ..**

महोदय/ महोदया,

विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागाकडून विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव मिळण्यासाठी विविध प्रकारचे उपक्रम राबविले जात असतात. विद्यार्थ्यांमध्ये वाचक, साहित्य, कवी इ. गुणांना वाव मिळावा तसेच त्यांना वाचनाची, लिहीण्याची आवड निर्माण होण्यासाठी साहित्य संमेलनाचे आयोजन केले जात असते.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील **विद्यापीठस्तरीय तिसरे बहिणाबाई विद्यार्थी साहित्य संमेलनाचे आयोजन कबचौउमवि संचलित, प्रताप तत्वज्ञान केंद्र, अमळनेर** येथे सोमवार, **दि. १० मार्च, २०२५ रोजी** आयोजित करण्यात येत आहे.

त्याअनुषंगाने आपल्या महाविद्यालयात नेमण्यात आलेल्या पंच दुतांपैकी, साहित्य दुत व साहित्यात रुची असलेले इतर ५ विद्यार्थी पाठवावेत. (३ विद्यार्थी व ३ विद्यार्थीनी) या साहित्य संमेलनात स्वलिखीत काव्यवाचन, कथाकथन, बोलीभाषा स्पर्धा, परिसंवाद असे विविध उपक्रम घेण्यात येतील. कृपया आपापल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची कलाप्रकार निहाय माहिती विद्यार्थी विकास विभागास sw@ nmu.ac.in या ई-मेल वर **दि. ०५ मार्च, २०२५** पावेतो पाठवावी, हि विनंती.

स्वलिखीत काव्यवाचन व कथाकथन स्पर्धेचे नियम सोबत जोडून पाठवित आहोत.

कळावे, धन्यवाद !

आपला विश्वासू,

18-2-25

(डॉ. जयेंद्र लेकुरवाळे)
संचालक, विद्यार्थी विकास

सोबत :- वरील प्रमाणे

प्रत -

१) मा. मानद संचालक, प्रताप तत्वज्ञान केंद्र, अमळनेर

२) मा. वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि, जळगाव

३) विभागप्रमुख, कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव

४) विभागप्रमुख, प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव

५) विभागप्रमुख, कुलसचिव कार्यालय, कबचौउमवि, जळगाव

D/Shivade/Sahitya samelan Amalner २०२४

**स्वलिखीत काव्यवाचन व कथाकथन स्पर्धेची नियमावली :-**

- **<u>काव्यवाचन - नियमावली</u>**

१) मराठी प्रमाणभाषेतील कविता असावी.

२) कविने स्वत: लिहिलेली व संयोजकांकडे दिलेली कविताच वाचावी.

३) कविता २० ओळींची मर्यादीत असावी.

४) कवितेचा विषय कुठलाही धर्म, समाज अथवा संस्कृतीवर टिका करणारी नसावा.

५) हिंदी किंवा इंग्रजी भाषेतील कवितेला परवानगी नाही.

६) कविता वाचनापूर्वी कवीने प्रस्तावनेपर काही बोलू नये. फक्त आपली कविता वाचावी.

७) परिक्षकांचा निर्णय अंतिम राहिल.

- **कथाकथन - नियमावली**

१) वेळ मर्यादा :- ५+२ मिनिटे राहील.

२) आशय कालसुसंगत असावा.

३) कुठल्याही धर्म, समाज अथवा संस्कृतीच्या टिका करणारी कथा नसावी.

४) परिक्षकांचा निर्णय अंतिम राहिल.

- **बोलीभाषा**

१) मराठी बोलीभाषेतील कविता, गाणे, नाटयछटा अपेक्षीत आहेत.

२) सादरकर्त्याने संयोजकांकडे दिलेले बोलीभाषेतील स्वलिखीत काव्य, गाणे, नाटयछटाच सादर करावे.

३) सादरीकरणाचा विषय कुठलाही धर्म, समाज अथवा संस्कृतीवर टिका करणारा नसावा.

४) हिंदी किंवा इंग्रजी भाषेतील सादरीकरणाला परवानगी नाही.

५) सादरीकरण करण्यापुर्वी सादरकर्त्याने आपल्या सादरीकरणाचा अल्प परिचर देण्यास हरकत नाही.

६) वेळ मर्यादा :- ५+२ मिनिटे राहील.

७) परिक्षकांचा निर्णय अंतिम राहिल.

- **परिसंवाद**

- परिसंवादासाठी जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्हयातील उपस्थित विद्यार्थ्यांमधून विद्यार्थ्यांची निवड करण्यात येईल.